महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

दिनांक - २ मार्च, २०२४

# प्रसिद्धी पत्रक

मागील काही दिवसापासून आयोगातील सचिव तसेच परीक्षा नियंत्रक व सहसचिव पदावर प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेल्या मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांबद्दल तथ्यहीन स्वरुपाच्या बातम्या काही विशिष्ट वर्तमानपत्रात येत आहेत. या सर्व बातम्यांचे आयोगाकडून खंडन करण्यात येत आहे.

२. आयोगाने शासनाकडे केलेली मागणी व विनंती विचारात घेऊनच शासनाने आयोगातील उपरोक्त दोन्ही पदावर मंत्रालय संवर्गातील वरिष्ठ अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्त केले आहेत. सदर दोन्ही अधिकारी मा. अध्यक्षांच्या सहमतीनेच आयोगात कार्यरत आहेत. त्यामुळे आयोगातील त्यांच्या नियुक्त्या बेकायदेशीर नाहीत, हे स्पष्ट करण्यात येत आहे.

३. या पदावरील अधिकाऱ्यांच्या सक्रिय योगदानामुळे व आयोगातील नियमित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांमुळे मागील जवळपास अडीच वर्षात कोविड काळातील प्रलंबित सर्व स्पर्धा परीक्षांचे आयोजन यशस्वीपणे करणे शक्य झाले आहे.

४. वरील दोन्ही पदावर शासनाने प्रतिनियुक्तीने केलेल्या नियुक्त्या आयोगाच्या मागणीनुसारच आहेत. सर्व उमेदवारांना आश्वस्त करण्यात येते की, आयोगाच्या सर्व परीक्षा अत्यंत सुरक्षित व पारदर्शक पद्धतीने आयोजित करण्यास आयोग कटिबद्ध आहे. त्यामुळे सर्व उमेदवारांनी निश्चिंत रहावे व वर्तमानपत्रात येणाऱ्या बातम्यांकडे लक्ष न देता आगामी परीक्षांच्या तयारीवर लक्ष केंद्रित करावे.

**ठिकाण :- नवी मुंबई**
**दिनांक :- २ मार्च, २०२४**

**सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**